| | |
|---|---|
| दाखल दिनांक | ०९/०१/२०१८ |
| नोंदणी दिनांक | ०९/०१/२०१८ |
| निकाल दिनांक | २७/११/२०१९ |
| कालावधी | ०१ व. १० म. १८ दि. |

**न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात, संग्रामपुर, जि. बुलढाणा.**

(पिठासन न्यायाधीश – संतोष आर. भरड)

**फौ.किरकोळ अर्ज क्र. १/२०१८** **निशाणी क्र. २६.**

**MHBU180000772018**

सौ. शोभा जाकीर तडवी,
वय : २२ वर्षे, धंदा घरकाम,
ह.मु. व्दारा न्यामत गंभीर सुरत्ने,
रा. आलेवाडी, ता. संग्रामपुर,
जि. बुलढाणा : **अर्जदार**

**– *विरुध्द* –**

१. जाकीर सलदार तडवी, (पती)
वय : २५ वर्षे, धंदा : शेती,

२. मेंदुलबाई ज. सलदार तडवी, (सासु)
वय ४५ वर्ष, धंदा शेती,

३. सलदार हसन तडवी, (सासरा)
वय ५० वर्ष, धंदा शेती,

४. शहारुख नजर तडवी, (भाचा )
वय २५ वर्ष, धंदा ॲटोचालक

५. नजीर तडवी, (नंदोई)
वय ५० वर्ष, धंदा शेती,

६. दादया उस्मान तडवी (जेठ)
वय ३० वर्ष, धंदा शेती,

७. उस्मान तडवी, (मामेसासरा)
वय ५० वर्ष, धंदा शेती,
सर्व रा. रसुलपुर, ता. जळगाव जामोद,
जिल्हा बुलडाणा. **गैरअर्जदार**

---

प्रकरण – कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम
२००५ नुसार कलम १२ अन्वये अर्ज.

---

श्री. जी. ए. क्षिरसागर अर्जदाराचे विद्वान विधीज्ञ.
श्री. एस. टी. कुरवाळे गैरअर्जदार क्रमांक १ यांचे विद्वान विधीज्ञ
गैरअर्जदार क्रमांक २ ते ७ यांच्याविरुद्ध दि. ११/१०/२०१९ रोजी प्रकरण खारीज करण्यात आले.

---

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक २७/११/२०१९)

प्रस्तुत अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण बाबतचे अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे**,

२. गैरअर्जदार क्रमांक १ हे अर्जदाराचे पती असून, इतर गैरअर्जदार गैरअर्जदार क्रमांक १ चे नातेवाईक आहेत. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांकडे संसाराकरीता रसुलपूर, तालुका जळगाव जामोद येथे नांदायला गेली असता गैरअर्जदारांनी किरकोळ कारणावरुन शारीरीक व मानसिक त्रास देत होते. त्यांचे म्हणणे होते की, ती दिसायला चांगली नाही, तिच्यापेक्षा सुंदर मुलगी मिळाली

असती, तीचे आईवडीलांनी त्यांना मनाप्रमाणे वस्तु व ५०,०००/– रुपये हुंडा दिला नाही. अर्जदार पाणि भरण्यास, शौच्छालयास बाहेर गेल्यास तीच्यावर संशय घेत. गैरअर्जदार क्र. १ पासुन तीला एक मुलगा नामे समर झाला. दिनांक १६.११.२०१७ रोजी रात्री ११.०० ते १२.०० वाजताच्या दरम्यान गैरअर्जदारांनी संगणमत करुन तीला ५०,०००/– रुपये घेवुन ये अशी मागणी करुन तीच्या चारीत्रावर संशय घेवुन तीला मारझोड केली. दुसरे दिवशी सकाळी सर्व गैरअर्जदारांनी तीचे अंगावर पेट्रोल टाकुन तीला जिवे मारण्याचा प्रयत्न केला. तीने ही बाब कुणाला सांगु नये म्हणुन तीला निर्वस्त्र करुन घरात डांबुन ठेवले होते. त्यानंतर दुसरे दिवशी तीचा भाउ आला असता अर्जदारास कोंडुन ठेवल्याचे दिसल्याने गैरअर्जदारांनी तीचेशी व तीचे भावाशी वाद करुन नेसत्या कपडयानिशी तीला घराबाहेर काढुन दिले. ती माहेरी आलेवाडी येथे आली असता दिनांक १९.११.२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता सर्व गैरअर्जदार आलेवाडी येथे आले व ती, तीचा मुलगा व तीचा लहान भाउ हजर असतांना तीला घाणेरडी शिवीगाळ केली. तीच्या लहान भावास लोटपाट करुन जिवे मारण्याची धमकी दिली. अर्जदाराने वरील घटनेबाबत पोलीस स्टेशन सोनाळा यांच्याकडे दिनांक २२.११.२०१७ रोजी लेखी कैफियत दिली. पोलीस स्टेशन मार्फत आपसात करण्याचा प्रयत्न केला परंतु गैरअर्जदारांनी अर्जदार हीचे गावात एका मुलासोबत अनैतिक संबंध आहेत असा आरोप घेवुन तीला वागवीणार नाही अशी धमकी दिली. ती तीचे माहेरी तीचे वडीलांचे दयेवर जिवन जगत आहे. तीचेकडे उत्पन्नाचे

कोणतेही साधन नाही. याउलट गैरअर्जदार क्र. १ धडधाकट असुन त्याचेकडे शेती आहे व त्यापासुन त्याला वार्षीक दहा ते बारा लाख रुपये उत्पन्न मिळते. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र. १ चे विरुध्द खावटी मिळण्याकरीता दाखल केला आहे. करीता गैरअर्जदार क्र. १ कडुन अर्जदाराला १५,०००/– खावटी मिळणे आवश्यक आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार क्र. १ यांनी लेखी म्हणणे निशाणी १३ व्दारे अर्जातील नाते संबंध सोडुन इतर सर्व कथने नाकारली आहेत. सदर लग्न संबंधांतुन अर्जदाराला गैरअर्जदार क्र. १ कडुन एक मुलगा नामे समर झाला आहे. अर्जदार ही गैरअर्जदाराकडे लग्नानंतर जेमतेम बारा महिने राहीली व त्याच काळात ती कुणालाही न सांगता माहेरी निघुन जात असे किंवा गावातील व्यक्तीसोबत कोठेतरी जात असे व त्याबाबत विचारणा केली असता उडवा उडवीची उत्तरे देत असे. मागील एक वर्षापासुन तीने गावातील जाबीर तडवी सोबत अनैतीक संबंध प्रस्थापीत केले होते. नोव्हेंबर २०१७ मध्ये गैरअर्जदार हा कामावरुन घरी आला असता अर्जदार ही जाबीर सोबत नको त्या अवस्थेत त्याचे घरामध्ये दिसुन आली. त्यावेळी गैरअर्जदार क्र. १ सोबत उस्मान गुलजार व शाहरुक नजीर हे हजर होते. अर्जदाराने पोलीस स्टेशनमध्ये तीचे अनैतिक संबंधाबाबत कबुली दिली होती. गैरअर्जदाराने अर्जदाराला दिनांक ११.१२.२०१७ व ३.१.२०१८ रोजी रजिष्ट्रर पोस्टाने नोटीस पाठवीली होती. तो मोलमजुरी करुन जीवन जगत आहे. सदरचा अर्ज खारीज करण्याची विनंती गैरअर्जदार यांनी केली आहे.

**४.** गैरअर्जदार क्रमांक २ ते ७ यांना न्यायालयाद्वारे समन्स तामिल झाले नाही, तसेच त्यांना समन्सची तामिली करून न्यायालयासमोर हजर करण्यासाठी अर्जदाराने प्रयत्नही केले नाही. त्यामुळे दिनांक ११/१०/२०१९ रोजी गैरअर्जदार क्रमांक २ ते ७ यांच्या हद्दीपर्यंत प्रकरण खारीज करण्यात आले.

**५.** अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. जी. ए. क्षिरसागर व गैरअर्जदारातर्फे श्री.एस. ए. गुप्ता यांचा युक्तीवाद ऐकले. न्याय निवाडयाकरीता खालील मुद्दे व निष्कर्ष कारण मिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. अर्जदारास कौटुंबिक हिंसाचार घडला आहे काय? | होय |
| २. अर्जदार कलम १८ अन्वये संरक्षण मिळण्यास पात्र आहे का? | नाही |
| ३. अर्जदार कलम १९ अन्वये निवाऱ्याची सोय करिता आदेश मिळण्यास पात्र आहे का? | अंशतः होकारार्थी |
| ४. अर्जदार क्र. १ व २ गैरअर्जदारा कडून कलम २० अन्वये अनुक्रमे दरमहा रुपये १५,०००/- व रुपये आर्थिक साहाय्य मिळण्यास पात्र आहे का ? | अंशतः होकारार्थी |
| ५. अर्जदार गैरअर्जदारातर्फे कलम २२ अन्वये नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे का ? | अंशता होकारार्थी |
| ६. आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

:: **पटलावरील पुरावा** ::

६. अर्जदारातर्फे त्यांच्या कथनाचे पृष्टर्थ अर्जदाराचा प्रतिज्ञालेख (**निशाणी १५**) दाखल केले आहे. तसेच कागदोपत्री पुराव्यांमध्ये कौटुंबिक घटना अहवाल, अर्जदाराने पोलीस स्टेशन सोनाळा येथे दिलेली लेखी तक्रार प्रत (**निशाणी १९**), लग्न पत्रीका यावर भिस्त ठेवली आहे.

७. सदर प्रकरणात गैरअर्जदार क्र. १ हा हजर झाला व त्याने त्याचा लेखी जबाब दाखल केला. परंतु नंतर वारंवार संधी देवुन देखील त्याने त्याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले नाही. त्यामुळ माझे पूर्व पीठासीन अधिकारी यांनी दि. १४/०३/२०१९ रोजी नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन प्रकरण गैरअर्जदार क्र. १ च्या विना पुरावा प्रकरण चालवीण्याबाबत आदेश पारीत केला आहे.

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र. १ करिता :-

८. अर्जदाराने तिच्या प्रतिज्ञालेखात अर्जातील मजकूराचा पुन:उच्चार केला आहे. अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ सोबत लग्न झाल्याचे, त्यांच्यातील पती-पत्नीचे नाते आजतागायत कायम असल्याचे, लग्नानंतर पैशाची मागणी करून, ती मागणी पूर्ण करण्याकरिता तिचा मानसिक व शारीरिक छळ केल्याचे व पैशाची मागणी पूर्ण न झाल्यामुळे अर्जदाराचा छळ केल्याचे सांगितले आहे. अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, अर्जदाराला खाण्यापिण्याचा, कपडयालत्याचा व

औषोधोपचाराचा खर्च येतो. गैरअर्जदार क्र. १ याचेकडे शेती आहे व त्यापासुन त्याला वार्षीक दहा ते बारा लाख रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ अर्जदारांना पोटगी देण्यास समर्थ आहे.

**९.** गैरअर्जदार क्रमांक १ यांच्यातर्फे अर्जदाराचा उलट तपास घेतला गेला नसल्यामुळे अर्जदाराची साक्ष विना आव्हानीत राहिली आहे. तसेच कागदोपत्री पुराव्यांमध्ये संरक्षण अधिकारी संग्रामपूर यांनी सादर केलेला कौटुंबिक घटना अहवाल पाहता त्याद्वारे अर्जदाराचा शारीरिक व मानसिक छळ झाल्याबाबत अर्जदाराचे न्यायालयासमोरील कथनास पृष्टी मिळाली आहे. तसेच तीने पोलीस स्टेशन सोनाळा येथे दि. २३/११/२०१७ रोजी गैरअर्जदारांचे विरुध्द दिलेली तक्रार (निशाणी १९) सादर केली आहे. त्यामध्ये देखील अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेऊन शारीरिक व मानसिक छळ केल्याचे नमूद केले आहे.

**१०.** उपलब्ध पुराव्या आधारे, अर्जदाराने हे सिद्ध केले आहे की, गैरअर्जदाराने तीचा ईच्छापुर्वक छळ केल्याचे व त्याग केला आहे. करीता अर्जदाराचा पुरावा अग्राहय ठरवीण्याची जबाबदारी गैरअर्जदाराला आली आहे.

**११.** गैरअर्जदार क्र. १ ने न्यायालयासमोर हजर होऊन आपले म्हणणे सादर केले असले तरी अर्जदाराची उलटतपासणी केली नाही तसेच त्यांच्यातर्फे कुठलाही पुरावा सादर केला गेला नाही. त्यामुळे अर्जदाराने प्रतिज्ञा लेखा आधारे

सादर केलेला पुरावा कायम राहिला आहे. अर्जदाराचा पुरावा नाकारण्याचे कुठलेही कारण पटलावर आले नाही. त्यामुळे अर्जदाराने अर्जदार हिच्या पुराव्या आधारे हे सिद्ध केले आहे की, गैरअर्जदारांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला आहे. करीता **मुद्दा क्र. १** चे उत्तर मी "**होकारार्थी**" नोंदविले आहे.

**मुददा क्र. २ करीता :–**

**१२**. अर्जदाराने प्रस्तुत अर्जाव्दारे गैरअर्जदारा विरोधात कौटूंबिक हिसांचारापासुन महीलांचे संरक्षण अधिनियम कलम १८ अन्वये संरक्षण मिळण्याची विनंती केली आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार यांनी प्रकरण दाखल झाल्यापासुन, आजतागायत अर्जदार किंवा तीचेवर अवलंबुन असलेल्या व्यक्ती विरुध्द कुठलीही कौटूंबिक हिसांचाराची घटना नमुद केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे फक्त अर्जदारांचे मागण्या आधारे गैरअर्जदार यांचे विरुध्द कलम १८ अन्वये आदेश पारीत करणे शक्य नाही. करीता **मुददा क्र. २** चे उत्तर "**नकारार्थी**" नोंदवीले आहे.

**मुददा क्र. ३ व ४ करीता :–**

**१३**. अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ कडुन दरमहा १५,०००/– खावटी मिळण्याची मागणी केली आहे. अर्जदारांच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदारांना शेतजमीनीपासुन रुपये १२,००,०००/– वार्षीक उत्पन्न मिळत असल्याचे

सांगीतले असले, तरी उत्पन्न सिध्द करण्याकरीता अर्जदाराने शपथपत्रा व्यतिरिक्त इतर कुठलाही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. त्यामुळे गैरअर्जदाराचे निश्चीत उत्पन्न दर्शवीणारा पुरावा पटलावर आला नाही.

**१४**. गैरअर्जदारांपैकी कुणाचे उत्पंन्न नेमके किती आहे, कोणत्या मार्गाने आहे, याबाबत कुठेही खुलासा करण्यात आला नाही. त्यामुळे फक्त मोगम कथना आधारे गैरअर्जदाराचे उत्पन्न अर्जदाराचे कथनाआधारे पुराव्या अभावी मान्य करता येणार नाही.

**१५**. तसे असले तरी, पती व पिता या नात्याने अर्जदाराचा सांभाळ करण्याची, त्यांना आर्थीक मदत करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ वर आहे. गैरअर्जदार क्र. १ याचे आर्थीक परिस्थीती बाबत पुरावा सादर केला गेला नसला तरी गैरअर्जदार क्र. १ धडधाकट असल्यामुळे तो अर्जदारांचा सांभाळ करण्यास सक्षम असल्याचे दिसून येते. सध्याचे जिवनावश्यक वस्तुंचे भाव व अर्जदार व गैरअर्जदार यांचे राहणीमानाचा विचार करता अर्जदारास घरखर्च, (निवाऱ्याची व्यवस्था म्हणुन) घरभाडे व इतर खर्चापोटी अर्जदारा करीता दरमहा २०००/- निर्वाह भत्ता मिळणे योग्य वाटते. म्हणुन मी **मुददा क्र. ३ व ४** करीता मी "**अशंतः होकारार्थी**" नोंदविले आहे.

**मुददा क्र. ५ करीता :–**

**१६.** अर्जदाराने तीचा छळ करुन त्रास दिल्याबाबत पाच लाख रुपये नुकसान भरपाईची मागणी केली आहे. अर्जदाराचे पुराव्यावरुन हे स्पष्ट झाले आहे की गैरअर्जदारांनी तीची छळवणुक केली आहे, त्यांचेकडे दुर्लक्ष केले आहे व गैरअर्जदारांनी दुर्लक्ष केल्यामुळे अर्जदारांना शारीरिक व मानसीक त्रास नक्कीच झाला आहे. त्यामुळे अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे. तसे असले तरी अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे रुपये पाच लाख कशा आधारे मोजदाद केली याबाबत कुठेही खुलासा केल्याचे दिसुन येत नाही.

**१७.** परंतु तसे असले तरी अर्जदाराचे उपलब्ध पुराव्या आधारे माझे मते अर्जदार यांना नुकसान भरपाई पोटी रुपये ३,०००/– देणे योग्य वाटते. म्हणुन **मुददा क्र ५** चे उत्तर "**अशंतः होकारार्थी** " नोंदवीले आहे.

**मुददा क्र. ६ करीता** :–

**१८.** अर्जदाराने तिच्या पुराव्या आधारे सिध्द केले आहे की, अर्जदारांनी तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार केला. तसेच मुददा क्र. ३ ते ५ यांच्या अशंतः होकारार्थी निष्कर्षावरुन, अर्जदारास खर्च व नुकसान भरपाई रक्कम मिळण्यास ती पात्र आहे. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज न्यायालयात दाखल करण्यासाठी

वकीलांचा खर्च व तारखेसाठी येण्याचा खर्च केला आहे. त्यामुळे गैरअर्जदाराकडुन अर्जदार खर्चाची रक्कम सुध्दा मिळण्यास पात्र आहे. करीता मी **मुददा क्र. ६** च्या उत्तरात खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदारांचा अर्ज अंशतः खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.
२. गैरअर्जदार क्र. १ याने अर्ज दाखल दिनांक ०९/०१/२०१८ पासून पुढील काळात अर्जदारास त्यांच्या पालनपोषन, घरभाडे व इतर खर्चाकरीता म्हणुन अर्जदारा करीता दरमहा रुपये २०००/– (रुपये दोन हजार फक्त) पोटगी व निर्वाह भत्ता म्हणुन दयावे.
३. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदारांना नुकसान भरपाई म्हणुन रुपये ३०००/– (रुपये तीन हजार फक्त) आदेशा पासून एक महिन्याच्या कालावधी मध्ये द्यावे.
४. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ यास अर्जाचा खर्च म्हणुन रक्कम रुपये १०००/–(रुपये एक हजार फक्त) दयावा.
५. या न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार व गैरअर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by Santosh Ramakant Bharad
Date: 2019.11.27 16:57:01 +0530

ठिकाण : संग्रामपुर (संतोष आर. भरड)
दिनांक २७/११/२०१९ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,संग्रामपुर